# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २६/०६/२०२४

➤ **गैरकायदा मंडळी :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन गाडगे नगर र अपक्र ५७५/२४ कलम- ४५२,१४३, १४७,१४९ ५०४,५०६ भादवी | आझादनगर गौसीयाम स्जिदजवळ अम. | गु.घ.ता.वेळ दि. २५/०६/२४ चे 03.30 वा<br><br>दाखलतावेळ दिनांक २५.०६.२४ चे 21.53 वा | शेख इरफान शेख कादर, वय 39 वर्ष रा आझाद नगर, गौसीया मस्जिदच्या दुस'या गल्लीत अमरावती | 1.अरबाज ऊर्फ तांबा, व त्याचा भाउ आझाद अधिक 03 इसम | हकीकत अशी की यातील फिर्यादी व आरोपी क्र.1 हे पुर्वी गांजा विक्रीचा व्यवसाय करत होते व त्यातुनच यातील आरोपीत क्र1 हा चांदुररेल्वे पोलीस स्टेशन अर्तगंत गांजा विक्रीकरतांना मिळुन आल्याने तो 3 ते 4 महीने राहीला. व त्याच कारणा वरून त्याने फिर्यादीला तो त्याचे करीता जेल मध्ये राहुन आला आहे असे म्हणुन 5 लाख रूपये मागत होता व नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी असतांना आरोपीत क्र.1 हा त्याचा भाउ व ईतर 4 सोबत त्याचे घरी आला व त्यांनी फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीला शिवीगाळी करून व पो.स्टे. ला रिपोर्ट केल्या स हात पायतोडण्याची धमकी देवुन घराबाहेरील कॅमे'याची तोड फोड करून त्यांचे सोबतच्या मोटरसायकलवर निघुन गेले. सदर बाबत फिर्यादीने आज रोजी पो.स्टे.ला हजर येवुन दिलेल्या रिपोर्ट वरून सदचा गुन्हादाखल करून तपासातघेतला. |
| २ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र.२४३/२ ४ कलम १४३,१४७, भादवी सह कलम १३५ म पो का | महानगर पालिकेच्या आवारात राजकमल चौक अमरावती | घटणा ता वेळ दि.२५.०६.२ ०२४ चे ११.४५ वा<br><br>दाखल ता वेळ दि.२५.०६.२ ०२४ चे १७.४६ वा | पो उप नि अजय मुलचंद जाधव नेमणुक पो स्टे सिटी कोतवाली अमरावती म | १ ` संजय माहुरकर २) विजय मलिक आणि ८ ते १० ईसम | हकिकत अशा प्रकारे आहे की, आम्ही पो उप नि जधव पो स्टे सिटी कोतवाली अमरावती शहर येथे तपास पथकात कर्तव्यावर असुन मी सरतर्फे रिपोर्ट देतो की दि.२५.०६.२०२४ रोजी ११.३० वा पासुन पो स्टे येथे हजर असतांना गुप्तबातमीदाराकडुन माहीती मिळाली की, माहानगर पालिकेच्या आवारात राजकमल चौक अम येथे काही लोकांनी हातात हॉकी स्टिक आणि दांडुके घेवुन जमावडा केला आहे. त्यावर आम्ही सोबत पोलीस स्टाफ पो उप नि रामप्रताप यादव पो हवा दिपक श्रीवास्तव ,प्रशांत बोंडे ,पो शी मंगेश दिघेकर असे तेथे ११.४५ वा दरम्यान पोहोचलो असता म न पा च्या आत आवारात ८ ते १० लोकांचा जमावडा दिसला असता आम्ही त्यांचे जवळ जावुन विचारपुस केली त्यांनी सांगितले की,ठेकेदार संजय माहुरकर व विजय मलिक यांचे बिल पासहोत नसल्याने आम्ही त्यांचे सोबत आलो आहे.त्या जमावातील काही लोकांकडे हॉकि स्टिक व दांडुके दिसत असल्याने तो जमाव एखादा दखलपात्र गुन्हा करन्याच्या उद्देशाने आनि तयारीने दिसत होता.करीता आम्ही त्यांना टोकले मात्र त्या जमावातील लोकांनी आमच्या आदेशाचे प्रतिकार करीत विरोधकेला .आणि ठेकेदार संजय माहुरकर व विजय मलिक यांचे बिल कसे पासहोत नाही अशा घोषणा करत दंगा करीत होते. ठेकेदार संजय माहुरकर व विजय मलिक यांचे बिल पास करन्याकरीता वरील ८ ते १० ईसम बेकायदेशिर मंडळी गोळा होवुन समान उद्देश साध्य करन्याकरीता दंगा करीत होते म्हणुन माझी ठेकेदार संजय माहुरकर व विजय मलिक आणि ८ ते १० ईसम विरोधात कलम १४३,१४७ भादवी सहकलम १३५ म पो का प्रमाने गुन्हा दाखळ करने कामी लेखी तक्रार आहे. |

## विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. सायबर अमरावती शहर अप.क्र. ३१/२०२४ कलम ३५४ (अ),५००, ५०९,३४ भा.द.वि. सहकलम ६७(अ) माहिती तंत्रज्ञान कायदा | छाया कॉलनी, रवि नगर, अमरावती | दिनांक २५.६.२०२४ चे ११.०० वा. ते २५/०६/२०२४ चे २०.०० वा.<br>दिनांक २५.६.२०२४ चे २१.०० वा. | विनोद पुंडलिकराव गुहे, वय ४२ वर्ष, व्यवसाय खाजगी सचिन, रा. छाया कॉलनी, रवि नगर, अमरावती | १)Asif Bebaak Sach News या नांवाचे फेसबुक पेजचा धरक<br>२) ६० ते ६५ वर्षाचा अनोळखी व्यक्ती<br>३) पोस्ट व्हायरल करणारे इतर व्यक्ती | हकीकत अशा प्रकारे आहे की, घटना, ता., वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी माजी महिला लोकप्रतिनिधी यांचा फोटो लावुन एक मुस्लीम समाजातील ६० ते ६५ वर्षाचा व्यक्ती अश्लिल भाषेचा वापर करुन एक व्हीडीओ बनवुन तो सोशल मिडीयावर प्रसारीत करुन तसेच त्यावर अनेक मुस्लीम लोकांनी वेगवेगळया घाणेरडया कमेंट्स करुन माजी महिला लोकप्रतिनिधी यांचे विषयी अश्लिल भाषेचा वापर केल्याने माजी महिला लोकप्रतिनिधी यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न होवुन त्यांचा विनयभंग करुन जनमानसात प्रतिमा मलीन करुन बदनामी केली आहे. करीता माजी महिला लोकप्रतिनिधी यांचे खाजगी सचिव यांनी तक्रार देवुन सदर अश्लिल भाषा वापरणा-या इसमांविरुध्द तसेच Asif Bebaak Sach News या फेसबुक पेज धारका विरुध्द, कमेंट करणा-या विरुध्द कारवाई करण्यात यावी, अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## ➢ फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भातकुली अप क्र 101/2024 □□□ 409 □□.□ | □□□□□□□ □. □□□□□ ाज □□□□□□ | ाद 25/02/2024 □□ 3/00 □□□□□□□□ □□□□□□□□□ ळाद 25/06/2024 □□ 16/51 □ | □□□ □□□□□□□□□□ □□ 71 वष □ □□□□□□□□, □□□□□ | ादलाप □□□□□ □ □□□□ □□ 60 वष □ कानफाडाता □□□□□ गुन्हृ गारा पुव □□□□□ □.स्टआभलखाव रउपल्बध नाहा | यातील फिर्यादी नामे दि . सूरेश अमृतराव मोहोड वय 71 वर्षे धंदा- शेती जात- धनगर रा. ग्राम गणोजादेवी ता. भातकूली जि. अमरावती मो.नं. 7822947341यांनीपो.स्टे ला येवुन जबानि रिपोर्ट दिलाकी, वर दिल्या पत्यावर कूटूबासह राहतो व ग्राम गणोजादेवी शेत शिवारात शेत सर्वे क्र. 49 मध्ये 5 एक्कर 10 गून्टे शेत असून सदर शेत वाहून मिळालेल्या उत्पनावरून मी कूटूबाचा उदरनिर्वाह करतो . मी माझे शेतात पराटी पेरले असून मला कापसाचे पिक झाले होते व सदर पिक मला अंदाजे 24 किंटल कापूस माल मला उत्पन झाले होते. त्यावेळी गावात दिलीप नरसिंगराव देशमूख वय 64 वर्षे रा. कानफोडी हा दलाल गावात फिरून लोकांचा कापूस खरेदी करीत असून गावातील सर्व कास्तकार आपला कापूस त्याचे कडे विकत होते. त्यावरून मी दिलीप देशमूख याला माझा सूध्दा कापूस विकायचा आहे. असे सांगीतले वरून त्यानी मला म्हटले की, मी गावात गाडी घेउन येतो व तूमचा कापूस विकत घेउन जोतो असे सांगीतले होते. त्यावरून दि. 25-02-2024 रोजी दूपारी 01/00 वा. दरम्यान माझे घरी गणोजादेवी येथे दिलीप नरसिंगराव देशमूख यांनी मला फोन करून सांगीतले की, मी माझी गाडी मजूरासह तूमच्या घरी पाठवत आहे. तूम्ही गाडीत माल भरून गाडीसह ।T। कॉलेज गणोजादेवी रोड भातकूली ला लागून असलेली महालक्ष्मी जिनिंग मध्ये या व तेथे गाडीचा काटा करून तूम्हाला कापूस मोजून देतील व मी तूम्हाला आल्यानंतर पैसे देतो काही वेळाने दिलीप नरसिंगराव देशमूख यांचे मजूर माझे घरी गाडी घेउन आले व माझे कडे असलेला कापूस माल मजूरानी गाडीत भरला व आणखी ही कास्तकाराचे कापूस सदर गाडीत भरून घेतला त्यानंतर मी सदर मजूर व माला सह गाडीत बसून सदर महालक्ष्मी जिनिग मध्ये आलो तेथे माझे कापूस मालाचा काटा केला असता त्याचे गाडीवगैर वजन सोडून 23 क्विटल 40 कीलो असे वजन भरले ज्याची किमंत अंदाजे 1,56,000 रू होते व त्यानंतर मी देशमूख यांनी सांगतले प्रमाने आपले घरी निघून आलो व देशमूख यांची पैसे देण्याची वाट पाहू लागलो. यामध्ये काही दिवस गल्यानंतर दिलीप देशमूख यांची भेट घेतली तर त्यानी मी तूम्हाला लवकरच पैसे देतो थोडे दिवस थांबून जा . तूम्हाला तूमचे पैसे देतो असे सांगीतले परंतू त्यानी पैसे दिलेले नाही. त्यानंतर मी वेळोवेळी त्यांना समक्ष भेटून किंवा कधी फोन लावून त्याना आपले कापसाचे पैसे बाबत मागनी केली असता त्यानी मला टाळाटाळ करने सूरू केले. व त्यादरम्यान मला माहीत पडले की, माझ्याप्रमाने दिलीप देशमूख याने भातकूली तालूक्यातील ईत्तर कास्तकारान सोबतही याच प्रमाने कापूऽस विक्री करून पैसे दिले नाही त्यामूळे मी आज |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पावेतो दिलीप नरसिंगराव देशमूख यांनी माझे 23 क्विंटल 40 कीलो असे वजन ज्याची किमंत अंदाजे 1,56,000 रू माझे कडून विकत घेउन मला पैसे न देता माझी फसवणूक केली आहे. करीता मी आज रोजी त्याचे विरूध्द तक्रार देत आहे कार्यवाही व्हावी . हाच माझा जबानी रिपोर्ट आहे सांगनेप्रमाने टंकलिखीत केला वाचून पाहीला बरोबर आहे.सदर गून्हा दाखल करून तपासात घेतला |

## चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ५७२/२०२४ क. ३७९ भादवि. | राजुरा सर्वे न. २४/०३, अमरावती | घटना ता वेळ - दि. २३/०६/२०२४ चे १७/३० वा.<br><br>दाखल ता वेळ - दि. २५/०६/२०२४ चे २१/४५ वा. | मुकुंद दौलत तातड वय ५२ वर्ष रा. वडाळी दैवी नगर, अमरावती | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे नमुद घटना ता वेळी व ठिकाणी काम संपवुन दुपारी १४/०० वा. घरी गेले असता व सांयकाळी १७/३० वा. कामावर येवुन पाहीले असता कामाच्या ठीकाणी ठेवलेले ६८ नग पैकी ५० नग लोखंडा अँगल कि.अ. ३००००/- रुपयाचे घटनास्थळा वर दिसुन आले नाही ते कोणीतरी अज्ञात चौरटयाने चोरुन नेले अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला -- |
| २ | नागपुरी गेट अप क्र. २३३/२४ कलम ३७९, ५११, ३४ भादवी | मौलाना आझाद कॉंलनी अम. | दि. २५/०६/२०२४ चे १२/४५ वा.<br>दि. २५/०६/२०२४ चे २२/२० वा. | संजय पंजाबराव लेवरकर वय ५० धंदा नोकरी उपविभागीय अभियंता महाजिवन प्राधिकरण अम. | १)अब्रारोद्दीन अमीनोद्दीन वय ४५ २) रियादोउद्दीन अमीनोद्दीन वय ४२ दोन्ही रा. मौलाना आझाद कॉंलनी अम. ३) अफसर सैय्यद रशिद वय ४८ रा. हबीब नगर न. २ अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील घ.ता. वेळी व ठिकाणी नमुद आरोपी क्र. १ व २ यांचे पाणी नळ जोळणीची थकबाकी असल्याने महा. जिवन जल व्यवस्थापन अम. कडुन दोन्ही नळ जोळणी खंडीत करण्यात आल्या नंतर हि यातील नमुद आरोपी क्र. १ व २ यांनी आरोपी क्र. ३ यांचे मदतीने दि. २५/०५/२४ रोजी १२/४५ वा. नमुद पुन्हा कनेक्शन जोडुन अवैद्दरित्या नळ जोळणी करुन पाणी चोरण्याचा प्रयत्न करतांना दिसुन आल्याने सदरचा गुन्हा दाखल करुन तापासात घेतला. |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती अप क्र.५७३/२०२ ४कलम २८३ भा.दवी. | जेल रोड चाट बाजार जवळ, अमरावती | घटना ता वेळ २५.०६.२०२४चे २०/१० वा.<br><br>दाखल ता वेळ २५/०६/२०२४ चे २२/४२ वा. | महिला पोलीस उप निरीक्षक पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | मोहन नारायण सोनवने वय ४८ वर्ष रा. राहुल नगर, बिच्छु टेकडी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे पोस्टाफ सह पोस्टे हद्दीत पेट्रोलीग करीत असताना नमुद आरोपी हा त्याची साई चायनीज चारचाकी गाडी सार्वजनीक रोडवर धोकादायक स्थितीने उभे करुन वाहतुकीस अडथळा निर्मान करताना दिसुन.नमुद आरोपीचे हे कृत्य कलम 283 भादवी प्रमाने होत असल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>गुन्हा दाखल लागलची दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा अप.क्र.४१९/२०२४ कलम २९४,५०६ भा.दं.वि. | | घटना ता.वेळ - दि.२५.०६.२०२४ टचे १७.०० वा.<br>दाखल ता.वेळ - दि.२५.०६.२०२४ चे २१.२२ वा. | एक महिला | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे की,यातील फि.व आरोपी हे शेजारी शेजारी राहतात. यातील आरोपी यांचे घर दुमजले असुन तिच्या वरचे रुममध्ये मुलामुलींना जागा उपलब्ध करुन देते. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपी यांचे घरात एक मुलगा व एक मुलगी प्रवेश करतांना दिसुन आले. वरुन फि.व मोहल्यातील दोन महिला हे आरोपी यांना विचारले असता आरोपी हिने अश्लील भाषेत फि.स शिवीगाळ केली. व तुझ्या कडुन काय होते ते करुन घे अशी धमकी दिली. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण- लागलीच |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्रं. ३७२/२०२४ कलम ५०१,५०४, ५०९ भादवी | दूर्गा विहार अमरावती | दि. २४/०६ /२०२४ च२१.३० वा.<br><br>दा. ता. वेळ २५/०६/२०२४ चे १८.५६ वा | एक महिला | एक महिला | हकीगत अशा प्रकारे आहेकी फीर्यादी हिचे पूणे येथे राहणार प्रविन बावनकर याचे सोबत साखरपूडा झाला आहे फि.हिचा इंस्टाग्राम यूजर नेम narara-०४ ID असा आहे सदर आय डी फि.यांनी ०२ वर्षापूर्वी सूरू केला फि.याचे घराजवळ राहणा-या मुलीसोबत मैत्री होती तसेच घरा जवळच राहणारा पवन सूनीलराव गोटफोडे वय २५ वर्ष हा सूध्दा असल्यामूळे तीघांची मैत्री होती मात्र दोन ते तीन वर्षा पासून ते तीघेही संपर्कात नव्हते दि.२४/०६/२०२४ चे १०.३० वा फि.यांच्या पतीचा त्यांना फोन आला व त्यांनी सांगीतले की तूझ्या इंस्टा आय डी वर माहाकाल का दिवाना या इंस्टा आय डी वरून अश्लील शब्द उच्चारले आहे मी सदर स्क्रीन शॅाट पाहीले असता त्यामध्ये सदर आय डी हा पवन याचा असून डी.पी .मध्ये त्याचा फोटो दिसत होता सदर मॅसेज बाबत फि.यांनी पवन ला विचारले असता पवन ने फि.यांना सांगीतले की सदर मॅसेज मी पाठविले नाही त्याची मैत्रीण हिने पवन चा आयडी वापरून तिचे स्वताचे मोबाइल वरून हे सदर चे मॅसेज पाठविले आहे तसेच फि.यांची बदनामी होइल या उददेशाने सदर मॅसे्ज फि.यांचे आय.डी वर इंस्टाग्रामवर टाकले आहे अशा फिर्यादीच्या जबानी री. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |